# बालवाडी बालकांच्या बागेची बारा सूत्रे

१. इतकी छोटी असावी की, ती संपूर्ण त्यांच्या नजरेच्या कवेत यावी; ती सगळी ‘आपली’ आहे, असे प्रत्येक बालकाला वाटावे.

२. ती इतकी मोठी असावी की, सर्व मुले एकाच वेळी तिथे बागडू शकतील.

३. ती स्वतंत्र व खास बालवाडीचीच व बालवाडीच्या अधिपत्याखाली असावी.

४. ती बालवाडीच्या इमारतीलगत अंगणासारखी असावी. मुलांना सहजपणे आतबाहेर करता यावे.

५. जमीन स्वच्छ व खेळण्यास सुरक्षित अशी असावी.

६. बाग सुंदर असावी, झाडा-फुलांनी बहरलेली असावी, पण, मोकळी जागाच भरपूर असावी.

७. मुलांना काही कृतियुक्त अनुभव देता येतील अशी सोय असावी.

८. भरपूर शारीरिक हालचाल, स्वतंत्रपणे खेळता येणे, खेळण्यातील विविधतेचे अनुभव मुक्त-मोकळे वातावरण आणि सौंदर्यानुभव अशी या बागेची विहित कार्ये असतील.

९. ही बाग अर्थातच, बालवाडीखेरीज अन्य मुलांसाठी नसेल.

१०. बागेत जास्तीत जास्त सावली असावी लागेल.

११. वाळू खेळ, घसरगुंडी-झोके आणि अन्य छोट्या आकारातील वस्तूंचे खेळ याच बागेत असावेत.

१२. बागेची नित्य देखरेख होत राहावी.

❖